# ‘मराठी अर्थशास्त्र परिषद’ जन्मकथा माझ्या काही आठवणी

गप्पांच्या ओघात काही कल्पना निर्माण होतात. त्यातही गप्पा जर निखळ बौध्दिक असतील तर कल्पनांना, परस्पर सहाय्याने अधिक नेटकेपणा येतो. त्यामुळे कल्पनांचे नेतृत्व सांघिक होते. ते सर्वांचेच श्रेय असते. कोण्या एकट्याचे नसते. या गप्पांत मला असाही अनुभव आला की, सामाजिक (शैक्षणिक) गरजांविषयी संबंधितांच्या गप्पा असतील तर त्या बऱ्याचदा कृतीच्या स्तरावर, अपरिहार्यपणे, पोचतात. आमचेही तसेच झाले.

सोवनी सर सपत्निक ठाण्याला माझ्या घरी राहायला आले होते. सोवनी सर हे माझे एम्.ए. चे शिक्षक. पुणे विद्यापीठात, मी मुंबईहून पुण्यास गेलो होतो. दोन वर्षे सोवनींच्या हाताखाली शिकायला मिळाले. त्यांनतरही, मी प्राध्यापकच झाल्यामुळे, काही प्रमाणात आमचे संबंध टिकून राहिले होते. माझ्या आग्रहाखातर, ते आमच्या घरी आले होते.

मी एस्.एन्.डी.टी. विद्यापीठात,मराठीतून अर्थशास्त्र थेट पदव्युत्तर स्तरावर शिकवू लागलो होतो. त्यावेळी, मराठीत अर्थशास्त्रावर फारसे काही वाङ्मय उपलब्ध नव्हतेच. तशी, त्यापूर्वीच, पुणे, नागपूर, कोल्हापूर व मुंबईत एस्.एन्.डी.टी. येथील महाविद्यालयांतून, अर्थशास्त्र हा विषय पदवी परीक्षेपर्यंत मराठीतून सुरु झाला होता. त्यामुळे प्राध्यापकांनी लिहिलेली काही थोडी क्रमिक पुस्तके मात्र उपलब्ध होती. पदव्युत्तर स्तरावर मराठीतून अर्थशास्त्र शिकवायला खूपच अडचणी जाणवत होत्या. माझ्या विद्यार्थिनींसाठी मराठीतून वाचण्यासाठी, अभ्यासण्यासाठी अक्षरशः काही नव्हतेच. ही गोष्ट आहे, १९६८-६९-७० या काळातील.

सोवनी सरांबरोबर पोटतिडिकेने मी माझ्या या अडचणी, थोडे सामान्यीकरण करून,मांडत होतो. दोन मुख्य मुद्दे मी मांडू पाहत होतो. एक म्हणजे, अर्थशास्त्रावर मराठीतून ग्रंथ निर्माण व्हायला हवेत; आणि दुसरा म्हणजे, पदवी व पदव्युत्तर स्तरावर शास्त्रांच्या शिक्षणासाठी एक माध्यम म्हणून मराठी भाषाही विकसित व्हायला हवी; आणि याचबरोबर, मराठीचा वापर शिकण्या-शिकविण्यासाठी आणि लेखन-वाचनासाठी करायचा असेल, तर यासाठी सुद्धा अर्थशास्त्रावर मराठीतून मोठ्या प्रमाणावर लेखन उपलब्ध होत गेले पाहिजे.

याच काळात आणि याच प्रश्नांच्या प्रेरणेतून मी स्वतः अर्थशास्त्रावरील काही पुस्तिका मराठीतून प्रकाशित करायला सुरुवात केली होती. पण असे वैयक्तिक प्रयत्न,अर्थातच गरजेच्या मानाने तोकडेच होते. शिवाय सातत्यपूर्ण लेखन होत जाण्यासाठी अर्थशास्त्रावर एखादे मासिकच सुरु करावे, असे माझ्या मनाने घेतले होते; आणि नेमके याविषयी आम्ही बोलत होतो.

सोवनी सर म्हणाले, “तुला अर्थशास्त्रावर एखादे मासिक काढायचे असेल तर जरूर काढ. मी तुला यासाठी लागणारे पैसे देईन. पण तरीही एक कर. तू पारिखांना भेट. ते तुला अधिक चांगला सल्ला देतील. खूप मदतही करतील.”

सोवनी सरांच्या या सल्ल्याने मी प्रोत्साहित झालो. लगोलग पुढील आठवड्यातच, जी. डी. पारीख यांना त्यांच्या घरी माटुंग्याला भेटायला गेलो. त्यांच्या पत्नी इंदुताई यांचीही पहिल्यांदाच भेट झाली. ('पहिलीच' असे म्हणण्याचे कारण असे की पारीख गेल्यानंतरही, वेगवेगळया संदर्भात डॉ. इंदुताई पारीख यांच्या भेटी होत गेल्या. त्यांच्याचमुळे, 'स्त्री हितकारिणी', 'सेंटर फॉर द स्टडी ऑव्ह सोशल चेंज' आणि 'रॅडिकल ह्युमॅनिस्ट ॲसोसिएशन' या संस्थांशी जोडलो गेलो! एवढेच नव्हे तर त्यावेळी पारीख पतिपत्नी लोकहितवादीचे संपूर्ण वाङ्मय संकलित व संपादित करीत होते. नेमके त्याचवेळी माझेही लोकहितवादी विषयीचे शोधकार्य चाळले होते. त्यामुळेही असेल कदाचित, पण आमचे छान जमले!)

आमच्या ह्या पहिल्याच भेटीत, पारीखांनी ठळकपणे दोन गोष्टी सांगितल्या, त्यांचे म्हणणे असे होते की, नुसते अर्थशास्त्रावरचे मासिक आणि तेही मराठीतून चालवणे आणि चालणे फार कठीण जाईल; त्यामुळे अशा मासिकाच्या मागे बळकट अये संस्थात्मक पाठबळ असायला हवे. त्यावर आपण आधी विचार करायला हवा. आणि याचा सविस्तर विचार करण्यासाठी (त्यावेळी) अर्थशास्त्र मराठीतून आणण्यासाठी आपापल्या स्तरावर जे कोणी काम करीत असतील त्यांना एकत्र बोलावून, आपण त्यांच्या बरोबर सविस्तर चर्चा करायला हवी. अशा काही लोकांची मला माहीत असलेली नावेही मी त्यांना सांगितली.

पुढे पारीखांनीच पुढाकार घेऊन, पुण्यात, महाराष्ट्र मुद्रणालयाच्या कार्यालयात आम्हा आठ-दहा लोकांची दोन दिवसांची एक सभा आयोजित केली.

या सभेला माझ्या आठवणीप्रमाणे, स्वतः पारीख, सोवनी, सबनीस, महाराष्ट्र ग्रंथनिर्मिती मंडळाचे तत्कालीन संचालक वामनराव चोरघडे, ठोंबरे, आनंद नाडकर्णी व स्वतः मी असे हजर होतो. (एखाद-दुसरे नाव विसरलेही असेल!)

ही दोन दिवसांची सभा खूपच उत्पादक आणि बौध्दिकदृष्टया मनोरंजकही होती. चर्चा गंभीर प्रश्नांवर होती पण वातावरण खेळीमेळीचे होते. पारीखांना, सर्वांना विचारांत गुंतवून ठेवण्याचे आणि तरीही स्वतंत्रपणे विचार मांडायला लावण्याचे कसब होते. त्यामुळे या पहिल्याच सभेत, समोर काही उद्दिष्ट ठेवून, सर्वांनी एकत्र येऊन, काम करण्यासाठी लागणारी जवळिक निर्माण झाली. आणि अर्थातच हा गट पुढे अनेक वर्षे काम करीतच राहिला.

या सभेत दोन निर्णय ठळकपणे घेण्यात आले. एक म्हणजे, 'मराठी अर्थशास्त्र परिषद' या नावाने एक, अर्थशास्त्रासाठी मराठीतून काम करणारी संस्था लगेचच स्थापन करावी; महाराष्ट्रातील वेगवेगळया विद्यापीठांतून व महाविद्यालयांतून शिकविणाऱ्या शिक्षकांना याचे सदस्य करावे, तसेच समाजातील, अर्थशास्त्राच्याच व्यापक क्षेत्रात काम करणाऱ्या काही व्यक्तींनाही या परिषदेशी जोडून घ्यावे दुसरा निर्णय घेतला तो म्हणजे 'अर्थसंवाद' हे नियतकालिक सुरू करण्याचा. थोडेसे कामाचे वाटपही लगेच करण्यात आले. प्रा. सबनिसांनी कार्यवाह म्हणून जबाबदारी घ्यावी. प्रा. आनंद नाडकर्णी आणि प्रा. रमेश पानसे यांनी मासिकाच्या संपादनाची जबाबदारी घ्यावी. प्रा. सोवनी यांनी कार्याध्यक्ष पदाची धुरा सांभाळावी. त्यावेळी सभेला हजर असणारे सर्वजण पहिल्या कार्यकारी मंडळाचे सदस्य झाले.

काम लगेच सुरू व्हावे, कामाला नेटकेपण यावे या दृष्टिनेही दोन निर्णय घेण्यात आले. पहिला निर्णय म्हणजे परिषद स्थापनेची सभा लवकरात लवकर घेऊन, धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणी करून घ्यावी. ही जबाबदारी कार्यवाह प्रा. सबनिसांकडे देण्यात आली. परिषदेचे कार्यालय, ‘सेंटर फॉर द स्टडी ऑफ सोशल चेंज’ या संस्थेच्या माटुंगा येथील कार्यालयातच ठेवण्यात आले.

या परिषदेबाबतचा दुसरा महत्त्वाचा निर्णय झाला तो, दरवर्षी परिषदेचे एक वार्षिक अधिवेशन घेण्यात यावे. पहिले अधिवेशन मुंबईत भरविण्यात यावे.

दुसऱ्या दिवशी दुपारी ही सभा संपली. त्यावेळची एक आठवण सांगतो. अगदी वैयक्तिक स्वरूपाची आणि तरीही मनावर ठसा उमटवून गेलेली!

त्याचे असे झाले, या दोन दिवसात प्रा. पारीखांशी माझे अत्यंत जिव्हाळयाचे संबंध जडले. या सभेत वयाने मी सगळयात लहान त्यामुळे, त्यांनी माझे खाण्यापिण्याचे लाड करणे स्वाभाविकच होते; आणि पारीखांचाही स्वभाव खूप उदार होता. केव्हा तरी मी त्यांना म्हटले, “सभा संपल्यावर मी तुमच्याबरोबरच मुंबईस येणार आहे !” पुन्हा पुन्हा हे मी त्यांना सांगतच राहिलो. त्यावर ते म्हणाले, “मला माहीत आहे, तुला माझ्याबरोबर फुकटात टॅक्सीने मुंबईला यायचे आहे! बरं तर मी नेईन तुला!” मी म्हटले, “नक्की न्यायचे हं, मला सोडून नाही जायचे!”

पुढे घडले ते असे. दुपारी सभा संपता संपता माझी एक मैत्रिण मला भेटायला आली; मी तिच्याबरोबर बोलत बोलत जरा वेळ बाहेर गेलो. सभा संपली आणि पारीख मला शोधू लागले. कुणीतरी त्यांना माझी मैत्रिण मला न्यायला आली होती, हे सांगितले. त्यावर ते उत्तरले, “मैत्रिणीबरोबर गेलाय ना? मग हा कसला लगेच येतोय!” असे म्हणून पारीख निघून गेले. मी लगेचच आलो, मी त्यांचा टॅक्सी स्टॅंडपर्यंत पाठलाग केला. पारीखसर पुढे निघून गेले होते.

अर्थातच मी दुसऱ्या वाहनाने माझ्या घरी ठाण्यास निघून गेलो. रात्री उशीरा घरी पोचलो. दुसऱ्या दिवशी नेहमीप्रमाणे कॉलेज आणि इतर कामे यात कार्यमग्न होतो. तिसऱ्या दिवशी सकाळच्या वृत्तपत्रात, पारीखसर वारल्याची बातमी वाचायला मिळाली. अखेरीस खरंच मी अनेकदा त्यांना सांगूनही पारीखसर मला सोडून गेले होते. कायमचे. पुन्हा कधीही न भेटण्यासाठी !

आयुष्यातला असाही एक अनुभव.

पुढे लवकरच, मराठी अर्थशास्त्र परिषद एक नोंदणीकृत संस्था झाली, आणि तिचे पहिले अधिवेशन थाटात मुंबईत पोदार कॉलेजमध्ये भरविण्यात आले. पारीखांची आठवण म्हणून आम्ही अधिवेशनाच्या परिसराला पारीखांचे नाव दिले होते. ही केवळ एक कृतज्ञता होती. पारीखांच्या मुळे तर इतक्या चटकन, मराठी अर्थशास्त्र परिषद उभी राहिली होती.

त्यानंतर सुमारे दशकभर मी परिषदेचे काम हिरिरीने करीत राहिलो. महाराष्ट्रात भटकंती केली; अनेक प्राध्यापकांना परिषदेचे महत्त्व पटवून देणे, त्यांना जमल्यास आजीव सदस्य, अथवा निदान वार्षिक सदस्य

करवून घेणे, वार्षिक अधिवेशने भरविण्यासाठी वेगवेगळया ठिकाणच्या वेगवेगळया संस्थांशी संपर्क साधणे ही कामे प्रा. सबनीस आणि त्यांच्या मदतीला मी अशी करीत राहिलो.

'अर्थसंवाद' च्या कामात प्रा. नाडकर्णींच्या हाताखाली काम करताना, संपादनाचे आणि एकूण अर्थशास्त्राचेही माझे आकलन वाढत गेले. कोणतेही सामाजिक काम, त्यात मन ओतून केले तर ते आपल्यालाच घडवत जात असते, याचा अनुभव मी घेतला. अर्थसंवादच्या कामात माझी अर्थशास्त्राची जाणही खूपच वाढली. मी हुकमी लेखनही करू लागलो. त्याकाळी, मी भारताच्या, विशेषतः महाराष्ट्राच्या एकोणिसाव्या शतकांतील घडामोडींकडे आवर्षित झालो होतो. लोकहितवादी, गोखले, रानडे, गणेश व्यंकटेश जोशी अशा तत्कालीन दिग्गजांनी मला अर्थशास्त्राच्या ऐतिहासिक शोधकार्यात उतरण्याची प्रेरणा दिली. त्यावर मी लेखनही खूप केले. अर्थसंवादमध्ये या काळातील अर्थशास्त्रावर, सुरुवातीच्या अंकांमधून माझे लेखन प्रसिध्द झालेले दिसेल. त्यातूनही लोकहितवादींना मी भारतातील पहिल्या पिढीचे अर्थशास्त्रज्ञ ठरविले. त्यांचे सर्वच लेखन, अगदी १९४८ सालच्या ग्रंथापासून तो थेट अखेरपर्यंतचे सारे सामाजिक व धार्मिक विषयांवरील लेखन हेही अर्थशास्त्रीय दृष्टिकोनांतून लिहिलेले लेखन आहे, हे मी प्रथमतः दाखवून दिले आहे.

"अर्थसंवादमधून अनेक वादविवाद झडले; रुसवे फुगवेही झाले. त्याने काही काळ, व्यक्तिगत कडवटपणाही आला. पण असे क्षण अनुभवणे हा आपल्या जीवनाचा एक अविभाज्यच भाग असतो वाटते. माझे प्रा. सोवानींशी न पटणे किंवा प्रा. वि.म.  दांडेकर यांच्याशी न पटणे हा त्यातलाच एक भाग होता. परंतु गंमत अशी की या दोघांबरोबरही मी, काही वेगळया कामात, एकत्र होतोच. उदाहरणार्थ, प्रा. नी.वी. सोवनी यांना एस्.एन्.डी.टी. विद्यापिठात, माझ्या कारकिर्दीत 'प्रोफेसर एमिरिटस' या पदावर आमंत्रित केले. तेही मनापासून आले. तसेच, प्रा. वि.म. दांडेकर यांच्याच 'अर्थबोध' संस्थेतही मी त्यांच्या मासिकाचा संपादक म्हणून काही वर्षे काम केले.

प्रा. आनंद नाडकर्णींनंतर प्रा. भ.ग. बापट हे अर्थसंवादचे  संपादक झाले. ते तर माझे जवळचे मित्र. भारतांतील दुष्काळांवरची त्यांची पुस्तिका मी माझ्या ऋचा ह्या प्रकाशन संस्थेतर्फे प्रसिध्द केली होती. या काळात बापटसरांना आवश्यक ती मदत अर्थसंवादसाठी मी करत राहिलो.

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे दहावे वार्षिक अधिवेशन मी स्वतः, पुढाकार घेऊन एस्.एन्.डी.टी. विद्यापीठाच्या परिसरात पुणे येथे भरविले. मी एस्.एन्.डी.टी. विद्यापिठांतच सुमारे तेवीस वर्षे पदव्युत्तर स्तरावर अर्थशास्त्राचा अध्यापक व विभागप्रमुख असल्यामुळे, हे अधिवेशन पूर्णतः मी माझ्या अंगावर घेऊ शकलो. डॉ. स. ह. देशपांडे हे या अधिवेशनाचे अध्यक्ष होते व प्रा. नीळकंठ रथ हे स्वागताध्यक्ष होते. या दोघांशीही माझा घनिष्ठ संबंध असल्यामुळे (डॉ. स. ह. देशपांडे हे तर माझे सख्खे मामा!) या अधिवेशनाच्या उभारणीत त्यांचे सर्वतोपरी सहकार्य, मी थोडेसे हक्कानेच घेऊ शकलो.

या अधिवेशनानंतर मात्र माझा मराठी अर्थशास्त्र परिषदेतील सहभाग ओसरू लागला. याला काही केवळ वैयक्तिक कारणे होती.

एक म्हणजे, १९८२ साली, मी अनुताई वाघ यांच्या इच्छेने व सहाय्याने 'ग्राममंगल' ही संस्था स्थापन करून, ठाणे जिल्ह्यातील खोलवरच्या आदिवासी भागांत प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली आणि माझ्या आयुष्यातील प्राधान्येच बदलत गेली. एकाच वेळी मी आदिवासी भागाच्या आर्थिक विकासाच्या उपक्रमांमध्ये

व आदिवासी मुलांच्या शिक्षणाच्या प्रयत्नांमध्ये गुंतून गेलो. तर दुसरीकडे श्री. मधुकरराव चौधरी यांच्या समवेत 'महाराष्ट्र ग्रामीण विकाससंस्था परिषद' ही वेगळीच परिषद उभी करून, तिच्या कामात बुडून गेलो. पुढे काही काळाने, गरजेनुसार मी 'महाराष्ट्र बालशिक्षण परिषदही' स्थापन केली आणि तिचे काम तर आजवर करीत आलो. पुढेही आयुष्याची वळणे बदलत गेली. मी अर्थशास्त्राकडून शिक्षणशास्त्राकडे वळलो, आणि मराठी अर्थशास्त्र परिषदेकडून आणखीनच दूर गेलो.

मला माहीत आहे की आजच्या, मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या विस्तारित अशा कार्यामध्ये मला कोणी ओळखतही नाही आणि ते योग्यही आहे. माणसाचे आयुष्य काय किंवा एखाद्या संस्थेचे जीवन काय, ते प्रवाही असते. माझ्या व्यक्तिगत आयुष्यात जशी वेळोवेळी, वेगवेगळी वळणे येत गेली व माझे आयुष्य बदलत गेले. तसेच, मराठी अर्थशास्त्र परिषदेत हिरिरीने काम करणाऱ्यांच्या पिढया बदलत गेल्या. नवे लोक येत गेले. आपापल्या परीने, परिषदेला सहाय्य करीत गेले; त्यामुळे संस्था नुसती टिकूनच नाही राहिली तर ते वयाबरोबर वाढतही गेली. अनेकांनी तिचा बुद्धिनिष्ठ सांभाळ केला आणि अर्थशास्त्र परिषदेला आजचे तिचे विस्तारित स्वरूप प्राप्त करून दिले आहे.

महाराष्ट्रात मराठी अर्थशास्त्र परिषदेनंतर, विविध शास्त्रीय विषयाच्या प्राध्यापकांनी विषयवार परिषदा स्थापन केल्या आहेत. उदाहरणार्थ, मराठी राज्यशास्त्र परिषद, मराठी मानसशास्त्र परिषद इत्यादी. मला वाटते शास्त्रांच्या औपचारिक शिक्षणाला मदतरूप अशा या चळवळीच उभ्या राहिल्या आहेत. मराठी अर्थशास्त्र परिषद त्यात अग्रेसर आहे!

मराठी अर्थशास्त्र परिषदेचा सुरुवातीच्या काळातील एक आजीव सदस्य असल्यामुळे, अर्थसंवाद मासिक आजही माझ्याकडे नियमितपणे येते. वार्षिक अधिवेशनांचे आमंत्रणही मला आवर्जून पाठविले जाते. आयुष्यातील अभ्यासाचे आणि कार्याचे विषयच बदलल्यामुळे मी या आमंत्रणांचा आस्वाद घेऊ शकलो नाही. पण हे उणेपण माझे आहे. परिषदेचे नाही!

❖